कोकणसाद
www.kokansad.com
मंगळवार, दि. २८ जून २०२२

## ५८ जणांची झाली तपासणी

# रक्तगट, हिमोग्लोबिन तपासणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्ग** : दोडामार्ग येथील सिंधू रक्तमित्र प्रतिष्ठान व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोडामार्ग तालुका वर्धापन दिनाचे औचित्य साधून रक्तगट हिमोग्लोबिन तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ५८ जणांची तपासणी करण्यात आली.



**दोडामार्ग येथील रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी शिबीर प्रसंगी दीपप्रज्वलन करताना डॉ. ज्ञानेश्वर एवळे, सोबत अध्यक्ष विवेकानंद नाईक व अन्य**

या तपासणीत ५८ पैकी २ निगेटिव्ह रक्तगट सापडलेत. तर ५८ पैकी १४ जणांचे हिमोग्लोबिनमध्ये कमतरता आढळून आली. या शिबिरच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर तहसीलदार अरुण खानोलकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर ऐवळे, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सिंधू रक्तमित्र प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष संजय पिळणकर, दोडामार्ग अध्यक्ष विवेकानंद नाईक, उपाध्यक्ष तुळसकर व गीतांजली सातार्डेकर, सचिव संतोष सातार्डेकर, एन. एस. एस. विभागाचे प्रा. दिलीप बर्वे, प्रा. इंगळे व दोडामार्ग तालुका आरोग्य विभागाचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी तथा प्रतिष्ठानचे संपर्क प्रमुख अजित सावंत, आरोग्य सेविका श्रुती शिरोडकर, रेश्मा क्षीरसागर, रजनी बुटे, आरोग्य पर्यवेक्षक सदाशिव आयनोडकर, प्रतिष्ठानचे सहसचिव वैभव रेडकर, रामकृष्ण दळवी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रतिष्ठानचे प्रसिद्धी प्रमुख भूषण सावंत यांनी केले. आभार एन. एस. एस. प्रमुख दिलीप बर्वे यांनी मानले.